# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**शैक्षणिक प्रवेश विभाग**

**केंद्रशासनाच्या विकलांगजन सशक्तीकरण विभागांतर्गत अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना सन २०१७–१८**

केंद्रशासनाच्या विकलांगजन सशक्तीकरण विभागामार्फत अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करण्यासाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सदर योजना राज्यामध्ये सन २०१७–१८ साठी Online पध्दतीने शासनामार्फत राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने शासनामार्फत अर्ज मागविण्यात येत आहेत. फक्त ऑनलाईन (Online) पध्दतीने भरलेले अर्जच स्वीकारले जाणार असून कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन (Offline) पध्दतीने अर्ज स्वीकारले जाणार नाही.

सोबत मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,पुणे–१ यांनी प्रसिध्द केलेली जाहिरात जोडत आहे. शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी खालील संकेतस्थळावर दिलेल्या सुचनेचे पालन करून User ID तयार करून Online अर्ज भरावा.

www.scholarships.gov.in

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे स्कॅन करून ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या जागी अपलोड करणे आवश्यक आहे.

शासनाने विहीत केलेल्या मुदतीत जे विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना केंद्रशासनाच्या विकलांगजन सशक्तीकरण विभागांतर्गत अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनाचा लाभ घेता येणार नाही. तरी पात्र विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीत अर्ज भरावे. यांची नोंद घ्यावी.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/२६३१
दिनांक :२७/०७/२०१७

**प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी**

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.
आपल्या विभागातील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबत सुचना देण्यात याव्यात.

My Computer/D/Prakash Natikar/Scholarship Circular 2017-18

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/पीएमएस/२०१७-१८/ 1658 दिनांक : १७.०७.२०१७

**अत्यंत महत्वाचे / मेलद्वारे**

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय : - केंद्रशासनाच्या विकलांगजन सशक्तीकरण विभागांतर्गत अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना सन २०१७-१८ च्या अंमलबजावणीबाबत.....**

संदर्भ : - १. केंद्रशासन विकलांगजन सशक्तीकरण विभाग मंत्रालय, नवी दिल्ली यांची जाहिरात
२. मा. शिक्षण संचालनालयाचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/अपंग पीएमएस/२०१७-१८/७३४४ दि. २१.०६.२०१७.

उपरोक्त विषयास अनुसरुन केंद्रशासनाच्या संदर्भिय जाहिरातीनुसार विकलांगजन सशक्तीकरण विभागामार्फत अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करण्यासाठी अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सदर अपंग विद्यार्थी आर्थिक सहाय्य पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०१७-१८ साठी राज्यामध्ये ऑनलाईन पध्दतीने कार्यान्वित करण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर शिष्यवृत्ती ११, १२ वी, पदवी व पदव्युत्तर डीग्री, तसेच डिप्लोमा व सर्टिफिकेट या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी इयत्ता १० वी व १२ वी ची परिक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून तसेच उच्च परिक्षा मान्यताप्राप्त विद्यापीठातून दिलेला विद्यार्थी अर्ज भरण्यासाठी पात्र असेल. सदर शिष्यवृत्तीची रक्कम ही विकलांगजन सशक्तीकरण विभाग नवी दिल्ली यांचेमार्फत विद्यार्थ्यांचे बँक खातेवर थेट जमा करण्यात येते.

केंद्रशासनाकडून सदर शिष्यवृत्तीसाठी नविन मंजूरीसाठी (Fresh) व विद्यार्थ्यांनी अर्जांची ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ व नूतनीकरणाचा (Renewal) ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक ३० जुलै, २०१७ आहे.

<u>योजनेच्या प्रमुख अटी</u>

१. अर्जदार हा भारताचा रहिवासी असावा.
२. अर्जदाराची अपंगत्व टक्केवारी ४० टक्के व त्यापुढील असावी.
३. अर्जदार मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
४. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.
५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २.५० लाख इतकी आहे.
६. एका कुटूंबातील फक्त २ अपंग अपत्यांनांच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७. विद्यार्थ्याने कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये स्वतःचे खाते उघडणे आवश्यक आहे.

<u>अर्जासोबतची आवश्यक कागदपत्रे</u>

१. विद्यार्थ्याचा फोटो
२. मागिल वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.
३. पालकाचे तहसिलदार यांचेकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
४. महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसिप्ट.

५. बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.
६. विद्यार्थ्यांचे अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र राज्य शासनाच्या सक्षम वैद्यकिय अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.
७. महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.
८. आधार कार्ड छयांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नसेल तर त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

- NSP 2.0 पोर्टल वरील मार्गदर्शक सूचनांनुसार रु. ५०,०००/- पेक्षा कमी शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जासोबतची कागदपत्रे महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर जतन करुन ठेवावी व सदर कागदपत्रे काटेकोरपणे तपासून अर्जावर पुढील कार्यवाही करावी. रु. ५०,०००/- पेक्षा जास्त शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जासोबत सदर कागदपत्रे UPLOAD करण्यात यावी.

महाविद्यालय / विद्यापीठाच्या प्रमुखांनी त्यांच्या महाविद्यालयातील / विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जात नमूद केलेला त्यांचा आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी लिंक केलेल्या असल्याची खात्री करावी. आधार क्रमांक बँक खात्याशी लिंक केलेला नसेल तर अशा सूचना संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज भरताना त्यांचा आधार क्रमांक त्यांच्या ज्या बँक खात्याशी लिंक केलेला आहे त्याच बँक खात्याचा क्रमांक अर्जात नमूद करावा अशा सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती सन २०१६-१७ ही राज्यात यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व पात्र महाविद्यालय / शैक्षणिक संस्था यांना सूचना देऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ होईल, यासाठी प्रयत्न करावे. मा. संचालनालयाच्या संकेतस्थळावर देण्यात आलेली केंद्रशासनाची सदर शिष्यवृत्तीबाबतची जाहिरात व या शिष्यवृत्तीसाठीची नोटिस महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयाच्या दर्शनी भागात लावण्याबाबत सर्व संबंधितांना आदेश देण्यात यावेत. तसेच विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर सदर शिष्यवृत्तीसाठी दिलेले ( FAQS) प्रश्न वाचून व समजून घेऊन अर्ज भरण्याबाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. तसेच या शिष्यवृत्तीबाबतची सविस्तर माहिती केंद्रशासनाच्या (www.disabillityaffairs.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तसेच महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह महाविद्यालयास प्राप्त होताच कागदपत्रांची पडताळणी करुन पात्र अर्ज त्वरित ऑनलाईन फॉरवर्ड करावेत.

**(डॉ. विजय पांडुरंग नारखेडे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

सोबत : - **महाविद्यालयांची यादी**

प्रति - १. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
३. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
४. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
५. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
६. प्राचार्य, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
७. प्राचार्य, वैद्यकिय महाविद्यालये.
८. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर.